॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव. दि.१३ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठस्तरीय युवारंग युवक महोत्सवात प्रताप महाविद्यालय, अमळनेरच्या संघाने प्रथम क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावले तर मुळजी जेठा महाविद्यालय, जळगावला उपविजेतेपद प्राप्त झाले.

दि.१२ जानेवारी पासून विद्यापीठाच्या प्रांगणात सुरु झालेल्या या युवक महोत्सवाचा आज मंगळवार, दि.१३ फेब्रुवारी रोजी अत्यंत जल्लोषात पारितोषिक वितरण समारंभ झाला. खान्देशातील रंगकर्मी व कॉमेडीची बुलेट ट्रेन फेम श्याम राजपूत यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील होते. व्यासपीठावर प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, युवारंग युवक महोत्सवाचे कार्याध्यक्ष तथा व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप रामू पाटील, माजी आमदार शिरीष चौधरी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्र.संचालक प्रा.ए.बी.चौधरी, वित्त व लेखाअधिकारी डॉ.बी.डी.कऱ्हाड तसेच विद्यार्थी परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी बोलतांना श्याम राजपूत म्हणाले की, कलावंतांनी आपल्या भाषेचा आणि आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगावा मात्र यशाचा गर्व येऊ देवू नये.जीवनात चांगला गुरु मिळणे आवश्यक आहे. प्रारंभीच्या काळात माझीही फसवणूक झाली, काही काळ नैराश्य आले. मात्र चांगले गुरु प्राप्त झाल्यामुळे आयुष्याला दिशा मिळाली. कलावंतांनी कोणत्याही गोष्टीची लाज बाळगू नये असे आवाहन करताना आपण काय करु शकतो हे आधी ठरवावे. प्रत्येकालाच हिरो व्हायचे आहे, मात्र आपल्यातील क्षमता ओळखा. संधी खूप आहेत. प्रत्येकालाच काम मिळू शकते आपल्या भाषेची, लकबीची लाज बाळगू नका. खान्देशात मोठी गुणवत्ता असून शाळेत खान्देश म्हणजे काय हे शिक्षकांनी शिकवले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करताना त्यांनी भाषणाची सुरुवातच राम राम भौ अशी खान्देशी भाषेत केली. स्वतःच्या आयुष्यातील काही प्रसंगही त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना सांगितले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी या सर्व कलावंतांमध्ये प्रचंड आत्मविश्वास होता, कलेत झोकुन देण्याची वृत्ती होती. जिंकण्याची आस होती आणि त्यासोबतच क्षितीजाला कवेत घेण्याची उर्मी देखील होती असे सांगून उज्वल वर्तमान घडविणारी पिढी या महोत्सवातून तयार होईल अशी अपेक्षा व्यक्त केली. कले इतका आनंद कोणत्याही प्रांतात नाही. हा आनंद पैशात किंवा व्यवहारात मोजता येणारा नाही. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक असा जो संदेश दिला आहे त्यावरून ही पिढी विचार करणारी जशी आहे तशी संवेदनशील देखील आहे यावर अधिक विश्वास बसला असल्याचे सांगितले.

श्री.दिलीप पाटील यावेळी मनोगत व्यक्त केले. त्यांनी कला ही देशाला उभी करण्यात सर्मपित करण्याचे आवाहन केले. संघव्यवस्थापकांच्या वतीने डॉ.आशा कांबळे यांनी यांनी तर विद्यार्थ्यांच्या वतीने स्वाती पाटील व सारांश सोनार यांनी मनोगत व्यक्त केले. माजी आमदार शिरीष चौधरी यांनी छुपे रुस्तुम है ही कव्वाली सादर केली.त्याला तरुणांनी उत्तम प्रतिसाद दिला.

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक महोत्सवाचे समन्वयक प्रा.अजय सुरवाडे यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.आशुतोष पाटील यांनी केले. प्रा.एस.टी.इंगळे, प्रा. विलास चव्हाण, प्रा.सत्यजित साळवे, प्रा.पंकजकुमार नन्नवरे, प्रा.राम पेटारे यांनी पारितोषिक विजेत्यांची यादी वाचून दाखविली. प्रा.मधुलिका सोनवणे यांनी आभार मानले.

**या स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणेः-**

**(१) कला प्रकार- संगीत**

**(अ) शास्त्रीय गायन-** उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (प्रथम), धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर (द्वितीय), प्रताप महाविद्यालय, अमळनेर (तृतीय)

**(ब) शास्त्रीय वादन (तालवाद्य)-** उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (प्रथम), पी.ओ.नाहटा वाणिज्य महा.भुसावळ (द्वितीय), संत गाडगेबाबा अभियांत्रिकी महाविद्यालय, भुसावळ (तृतीय)

**(क) शास्त्रीय वादन (सुरवाद्य)**- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (प्रथम), वाय.एन.चव्हाण महा.चाळीसगाव (द्वितीय), धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर (तृतीय)

**(ड) सुगम गायन (भारतीय)-** पी.ओ.नाहटा वाणिज्य महा.भुसावळ (प्रथम), उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (द्वितीय), एम.जी.एस.एम कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चोपडा (तृतीय)

**(इ) सुगम गायन (पाश्चात्य)-** प्रताप महाविद्यालय, अमळनेर (प्रथम), जी.एच.रायसोनी इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनेजमेंट, जळगाव (द्वितीय), मुळजी जेठा महविद्यालय, जळगाव (तृतीय)

**(ई) समुहगीत (भारतीय)-** नानासाहेब वाय.एन.चव्हाण महाविद्यालय, चाळीसगाव (प्रथम), धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर (द्वितीय), उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (तृतीय)

**(फ) समुहगीत (पाश्चात्य)-** प्रताप महाविद्यालय, अमळनेर (प्रथम), नाहाटा महाविद्यालय, भुसावळ (द्वितीय), मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (तृतीय)

**(ग) लोकसंगीत-** प्रताप महा.अमळनेर (प्रथम), उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (द्वितीय), बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव (तृतीय),

**(घ) भारतीय लोकगीत-** एम.जी.एस.एम.कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चोपडा (प्रथम), उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (द्वितीय), प्रताप महा.अमळनेर (तृतीय),

**(२) नृत्यकला**

**(अ) समुह लोकनृत्य-** प्रताप महा.अमळनेर (प्रथम), मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), एम.जी.एस.एम.कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चोपडा (तृतीय)

**(ब) शास्त्रीय नृत्य-** मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (प्रथम), एस.एस.व्ही.पी.एस.कला व वाणिज्य महाविद्यालय, धुळे (द्वितीय), शिरीष मधुकरराव चौधरी महाविद्यालय, जळगाव (तृतीय)

**(३) साहित्य कला**

**(अ) वक्तृत्व स्पर्धा-** डॉ.आंबेडकर विधी महाविद्यालय, धुळे (प्रथम), शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (तृतीय)

**(ब) वादविवाद स्पर्धा-** मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (प्रथम), नाहाटा महा.भुसावळ (द्वितीय), झेड.बी.पाटील महाविद्यालय, धुळे (तृतीय)

**(क) काव्यवाचन स्पर्धा-** प्रताप महाविद्यालय, अमळनेर (प्रथम), उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (द्वितीय), जी.टी.पी.महाविद्यालय, नंदूरबार (तृतीय)

**(४) नाटयकला**

**(अ) विडंबन नाटय-** प्रताप महाविद्यालय, अमळनेर (प्रथम), मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), झेड.बी.पाटील महाविद्यालय, धुळे (तृतीय)

**(ब) मुकनाटय-** एम.जी.एस.एम. कला,वाणिज्य व विज्ञान महा.चोपडा (प्रथम), प्रताप महाविद्यालय, अमळने (द्वितीय), मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (तृतीय)

**(क) मिमिक्री-** मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (प्रथम), पूज्य साने गुरुजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा (द्वितीय), पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे डी.एन.पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय, शहादा (तृतीय)

**(५) ललित कला**

**(अ) रांगोळी स्पर्धा-** जी.डी.बेंडाळे महिला महा.जळगाव (प्रथम), मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (द्वितीय), एम.जी.एस.एम. कला,वाणिज्य व विज्ञान महा.चोपडा (तृतीय),

**(ब) चित्रकला स्पर्धा-** मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (प्रथम), जी.टी.पी.महाविद्यालय, नंदूरबार (द्वितीय), जे.डी.एम.व्ही.पी.एस.चे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव (तृतीय)

**(क) कोलाज-** पूज्य साने गुरुजी शिक्षण मंडळाचे कला,वाणिज्य व विज्ञान महा.शहादा (प्रथम), जे.टी.महाजन अभियात्रिकी महाविद्यालय, फैजपूर (द्वितीय), जेटीईजीडीएम कला,के.आर.एन.वाणिज्य व एम.डी.विज्ञान महाविद्यालय, जामनेर (तृतीय)

**(ड ) व्यंगचित्र-** बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव (प्रथम), पूज्य साने गुरुजी शिक्षण मंडळाचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शहादा (द्वितीय), मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (तृतीय)

**North Maharashtra University, Jalgaon**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६
'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**



**(इ) क्ले मॉडेलिंग-** प्रताप महाविद्यालय, अमळनेर (प्रथम), एसएसव्हीपीएचे घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे (द्वितीय), एम.डी.पालेशा वाणिज्य महाविद्यालय, धुळे (तृतीय)
**(ई) स्पॉट पेटींग-** मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव (प्रथम), एसएसबीटी अभियांत्रिकी महाविद्यालय, बांभोरी (द्वितीय), प्रताप महाविद्यालय, अमळनेर (तृतीय)
**(फ) फोटोग्राफी-** उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव (प्रथम), जी.एच.रायसोनी इन्स्टिटयूट ऑफ बिझिनेस ॲण्ड मॅनेजमेंट, जळगाव (द्वितीय), आर.सी.पटेल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर (तृतीय)
**(ग) इन्स्टॉलेशन-** बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव (प्रथम), बी.पी.कला एम.ए.विज्ञान के.के.सी.वाणिज्य महाविद्यालय, चाळीसगाव (द्वितीय), एसएसव्हीपीएसचे घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे (तृतीय)

**कलाप्रकारनिहाय विजेतेपद**

**(१) संगीत-** उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
**(२) नृत्यकला-** मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव
**(३) साहित्यकला-** मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव
**(४)नाटयकला-** मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव
**(५)ललित कला-** बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

**सर्वोत्कृष्ट**
**प्रथम-** डॉ.जी.डी.बेंडाळे स्मृती चषक- प्रताप महाविद्यालय, अमळनेर
**द्वितीय-** कै.कुसुमताई चौधरी स्मृती चषक- मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव

---

जा.क्र. : उमवि/१६/हस्तदेय/२०१८ दिनांक : १३ जानेवारी, २०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**
कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी